# 11 मार्च

**आजचा सुविचार :**

"आवड आणि आत्मविश्वास असेल तर कुठलीही गोष्ट अवघड नाही."

**आजचे पंचांग :**

वार – शुक्रवार — दिनांक : 11 मार्च 2022

मास - फाल्गुन — नक्षत्र – मृग

सूर्योदय – सकाळी 6. 46 वाजता — सायंकाळी 6. 42 वाजता

**आजचे दिनविशेष :**

सन 1689 साली मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे थोरले पुत्र छत्रपती संभाजीराजे भोसले यांची मुगल बादशाहा औरंगजेब याने हत्या केली होती.

सन 1886 साली आनंदीबाई जोशी यांना फिलाडेल्फिया विद्यापीठात डॉक्टर पदवी प्रदान करण्यात आली होती.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1)Father – वडील 2) Mother : आई 3) Brother – भाऊ 4) Sister – बहिण 5) Uncle – काका/ मामा 6) Grandmother – आजी 7) Grandson – नातू 8) Nephew – पुतण्या / भाचा 9) Niece – पुतणी / भाची

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) आपले राज्य भारत देशाच्या कोणत्या दिशेला आहे?

2) बेरीबेरी हा रोग कोणत्या जीवनसत्वाच्या अभावाने होतो?

3) 20 बेरीज येणाऱ्या कोणत्याही चार समसंख्या सांगा.

4) चार धातूंची नावे सांगा.

**बोधकथा :**

## कुणाला कमी समजू नये

प्रयाग (गया) येथे एक खूप चांगले पंडित राहत होते. एकदा नेपाळचे राजे सामान्य वेशात पंडितांमागे फिरू लागले, माझ्या आजोबांचे पिंडदान करून द्या, माझ्याजवळ काहीच पैसे नाहीत. थोडेसे लाडू भरून आणलेत तेच दक्षिणा म्हणून स्वीकार करून घ्या. जे लोभी पंडित होते त्यांना पैशाची हाव होती त्यांनी या सामान्य वेशातील राजांना नकार दिला. अशा वेळेस राजांना तेथील एक पंडित गाठ पडला. त्याला महाराजांनी पिंडदान करण्याची विनंती केली. त्याने ती कबूल केली. तो म्हणाला, भाऊ! पैशाची काही बाब नाही. मी पिंडदान करून देतो.

त्या पंडिताने फाटक्या तुटक्या कपड्यात आलेल्या राजांचे पिंडदान पूर्ण करून दिले. यावर महाराज खूश झाले. त्या वेळेस ते त्याला म्हणाले, पंडितजी! या कार्यानंतर काही न काही दक्षिणा मी तुम्हास देणे लागतो. मी घरून काही लाडू आणले आहेत त्याचा तुम्ही स्वीकार करावा. मात्र या लाडूचे गाठोडे तुम्ही घरी जाऊन उघडावे. पंडित म्हणाले, बरं भाऊ, तुम्ही गरीब दिसता पण तुम्ही प्रेमाने दिलेल्या लाडूचा मी स्वीकार करतो. या नंतर पंडितास ते गाठोडे देऊन राजे निघून गेले. पंडिताने घरी जाऊन जेवायला बसायची तयारी केली. अचानक त्याला लाडूची आठवण झाली त्यावर त्याने ते गाठोडे सोडून पाहिले असता तो चकित झाला. कारण त्या गाठोड्यात वीस सोन्याचे लाडू होते.

**तात्पर्य-** कधीही कुणाला कमी समजू नये कारण कोणत्या रुपात कोण असेल याचा भरवसा नाही.